आवक क्र. : अग्रे 11652
दिनांक : 14 DEC 2022
उपमुख्य.अ. बीडीडी/मुं.मं.

महाराष्ट्र शासन
गृहनिर्माण विभाग

३ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय (मुख्य इमारत), मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र. ०२२-२२७९ ३६९६ ई-मेल:gnp.housing@maharashtra.gov.in

---

क्र:- संकीर्ण-२०२१/प्र.क्र. २५१/गृनिप दिनांक :- १ डिसेंबर, २०२२

मुं. गृ. नि. व क्षे. वि. मंडळ
आवक क्र. 11652
दिनांक 5/12/22

म. गृ. नि. व क्षे. प्राधिकरण
आवक क्र. 11652
दिनांक - 2 DEC 2022
अधिकारी

प्रति,
उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
तथा सदस्य सचिव, शक्ती प्रदत्त समिती-बी.डी.डी. चाळ पुनर्विकास,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व)
मुंबई - ४०० ०५१.

विषय:- मुंबई विकास विभाग (बी.डी.डी.) चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पासाठी गठीत शक्ती प्रदत्त समितीच्या दि.१३.१०.२०२२ रोजी झालेल्या १७ व्या बैठकीच्या इतिवृत्तास मंजूरी देणेबाबत

संदर्भ:-आपले पत्र क्र.उपा/प्रा./उपमुअभि/बीडीडी/मुं.मं./न- /२३२/२०२२, दि.२०.१०.२०२२

महोदय,

उपाध्यक्ष/म्हाडा यांचे स्वीय सहाय्यक

मुंबई विकास विभाग (बी.डी.डी.) चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पासाठी गठीत शक्ती प्रदत्त समितीच्या दि. १३.१०.२०२२ रोजी झालेल्या १७ व्या बैठकीचे इतिवृत्त मा.मुख्य सचिवांनी खालीलप्रमाणे मंजूर केले आहे:-

| अ.क्र. | विषय | बैठकीत झालेली चर्चा व समितीचा निर्णय/निर्देश |
|---|---|---|
| १ | समितीच्या १६ व्या बैठकीच्या इतिवृत्तास मंजूरी देणेबाबत. | **शक्ती प्रदत्त समितीच्या १६ व्या बैठकीच्या इतिवृत्तावर सविस्तर चर्चा झाली व चर्चेअंती सदरील इतिवृत्तास समितीने मंजूरी दिली.** |
| २ | बी.डी.डी. चाळ पुनर्वसन प्रकल्पातील इमारतींच्या देखभालीची जबाबदारी म्हाडाने १२ वर्षापर्यंत घ्यावी. | यासंदर्भात बैठकीमध्ये प्रथमत: म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी असे नमूद केले की, तत्कालीन मा.मंत्री (गृहनिर्माण) यांनी त्यांच्याकडील दि.३०.३.२०२२ रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे, म्हाडाने बी.डी.डी. चाळींतील पुनर्विकसित इमारतींच्या देखभालीची जबाबदारी १० वर्षांच्या ऐवजी १२ वर्षापर्यंत घेण्याचे निश्चित केले आहे आणि सदरहू बाब रहिवाश्यांसोबत करावयाच्या करारनाम्यामध्ये नमूद केली आहे. सदरहू बदलास कार्योत्तर मंजूरी देण्याची विनंती म्हाडाने समितीसमोर केली. तथापि, उक्त १० वर्षाचे १२ वर्षे करण्याचा निर्णय म्हाडाने त्यांच्या स्तरावर घेतलेला आहे. सदरहू बाब शक्ती प्रदत्त समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.<br>उपरोक्त चर्चेअंती या मुद्याबाबत समितीने |

C:\Users\DEEL\Desktop\प्रविण\प्रविण\letters\MHADA Letters.docx

८८४/३२६८

| | | |
|---|---|---|
| | | पुढीलप्रमाणे निर्देश दिले:-<br>***"बी.डी.डी. चाळींतील पुनर्विकसित इमारतींच्या देखभालीची जबाबदारी म्हाडाने विकास नियंत्रण नियमावली मधील तरतूदीनुसार १० वर्षांच्या ऐवजी १२ वर्षांपर्यंत घ्यावी, या प्रस्तावावर निर्णय घेणे शक्ती प्रदत्त समितीच्या कार्यकक्षेत येत नसल्याने याबाबत समितीने विचार केला नाही."*** |
| ३ | बी.डी.डी. चाळीतील पुनर्विकसित गाळा ताबा मिळाल्यापासून १० वर्षांनंतर विक्री केल्यास त्यापुढील कालावधीतील सदर गाळयाच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी संबंधीत गाळा खरेदीदाराची राहील. | उपरोक्त मुद्दा क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे बी.डी.डी. चाळींतील पुनर्विकसित इमारतींच्या देखभालीची जबाबदारी १० वर्षांच्या ऐवजी १२ वर्षांपर्यंत घेण्याचा निर्णय म्हाडाने त्यांच्या स्तरावर घेतलेला असून सदरहू बाब शक्ती प्रदत्त समितीच्या कार्यकक्षेत येत नाही. त्यामुळे मुद्दा क्र.३ मध्ये नमूद केलेली बाब देखील शक्ती प्रदत्त समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.<br>उपरोक्त चर्चेअंती या मुद्याबाबत समितीने पुढीलप्रमाणे निर्देश दिले:-<br>**"बी.डी.डी. चाळीतील पुनर्विकसित गाळ्याची विक्री एखाद्या गाळेधारकाने १० वर्षानंतर परंतु १२ वर्षांच्या आत केल्यास, त्या दोन वर्षांतील कालावधीच्या देखभालीची जबाबदारी संबंधित गाळे खरेदीदाराची असेल, या प्रस्तावावर निर्णय घेणे शक्ती प्रदत्त समितीच्या कार्यकक्षेत येत नसल्याने याबाबत समितीने विचार केला नाही."** |

मा.मुख्य सचिवांनी वरीलप्रमाणे मंजूर केलेल्या उक्त बैठकीच्या इतिवृत्तास अनुलक्षून पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

आपला,

(मु.उ.भरोसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:- निवडनस्ती (गृनिप), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई.